महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
Maharashtra Housing & Area Development Authority
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर,
वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१. दू. क्र. :- ०२२ ६६४०५०७७,
६६४०५०६६ ई मेल - cpromhada@gmail.com

==========================================================================

जावक क्रमांक — ९८३ /०८ दिनांक :- ०१ मार्च, २०२३

प्रसिद्धीपत्रक

# म्हाडातर्फे बृहन्मुंबई क्षेत्रातील सुमारे नऊ एकर जमिनीवरील अतिक्रमण निर्मूलन

## मुंबई मंडळाच्या अतिक्रमण निर्मूलन विभागाची कारवाई :१६ अनधिकृत पक्की बांधकामे तोडली, ०४ भूखंडांवरील अतिक्रमण हटविले

## मालवणी मालाड परिसरातील भाब्रेकर नगर येथे असणाऱ्या सात एकर भूखंडावरील १५० अनधिकृत झोपड्या निष्कासित

मुंबई, दि. ०१ मार्च, २०२३ :- म्हाडाच्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळांतर्गत कार्यरत अतिक्रमण निर्मूलन विभागाने गेल्या २ महिन्यांत राबविलेल्या अतिक्रमण निर्मूलन मोहिमेत बृहन्मुंबई क्षेत्रातील १६ अनधिकृत पक्की बांधकामे तोडण्यात आली असून चार भूखंडांवरील अतिक्रमण हटविण्यात आले आहे. सदर मोहिमेत सुमारे ९ ते १० एकर म्हाडाच्या भूखंडावरील अतिक्रमण हटविण्यात यश आले असून या मोहिमेत मालवणी मालाड परिसरातील भाब्रेकर नगर येथे असणाऱ्या सात एकर भूखंडावरील १५० अनधिकृत झोपड्या हटविण्याच्या सर्वात मोठ्या अतिक्रमण निर्मूलन कारवाईचाही समावेश आहे.

म्हाडा मुंबई मंडळाच्या अखत्यारीतील भूखंडांवर अतिक्रमण, तसेच अनधिकृत बांधकामेही होत असल्याचे निदर्शनास आले असून याला प्रतिबंध करण्यासाठी मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मिलिंद बोरीकर यांच्या निर्देशानुसार अतिक्रमण निर्मूलन विभागाचे प्रमुख उपजिल्हाधिकारी श्री. संदीप कळंबे यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळातर्फे अतिक्रमण निर्मूलन मोहिमेला गती देण्यात आली आहे. मंडळातर्फे गेल्या दोन महिन्यात राबविलेल्या अतिक्रमण निर्मूलन मोहिमेत गोरेगावमधील सिद्धार्थ नगर, मोतीलाल नगर, मालवणी मालाड, दिंडोशी मालाड पूर्व, सांताक्रूझ पूर्व, कोले कल्याण, एसव्हीपी नगर वर्सोवा-अंधेरी पश्चिम, टागोर नगर - विक्रोळी, आकुर्ली म्हाडा वसाहत - कांदिवली पूर्व, आनंद नगर सांताक्रूझ पूर्व या भागातील म्हाडाच्या भूखंडांवरील अतिक्रमण काढण्यात आले असून अनधिकृत बांधकामे तोडण्यात

आली आहेत. या मोहिमेत मालवणी मालाड येथील १.८० एकर भूखंडावरील अतिक्रमण नुकतेच हटविण्यात आले आहे.

दि. २३ मे, २०१८ राजपत्रातील अधिसूचनेनुसार म्हाडास विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून एमआरटीपी ऍक्ट १९६६ च्या प्रकरण चार कलम ४३ ते ५८ मधील म्हाडा जमिनीवरील विनापरवाना बांधकाम निष्कासित करण्याचे अधिकार शासनाने 'म्हाडा'कडे सुपूर्द केले आहेत. त्यानुसार प्राधिकरणाने दि. २८ ऑगस्ट, २०२० रोजीच्या आदेशान्वये मुंबई मंडळात क्षेत्रनिहाय ३४ पदनिर्देशित अधिकारी नियुक्त केले आहेत. संबंधित उपअभियंता व मिळकत व्यवस्थापक यांचा या पदनिर्देशित अधिकाऱ्यांमध्ये समावेश आहे. या अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रात आढळून येणाऱ्या नवीन/ वाढीव विनापरवाना बांधकाम करणाऱ्या व्यक्तीस सदर अधिनियमाच्या तरतुदीनुसार रीतसर २४ तासाची / ०७ दिवसाची नोटीस देऊन बेकायदेशीर बांधकाम विहित मुदतीत निष्कासित करण्याची जबाबदारी या पदनिर्देशित अधिकाऱ्यांवर आहे.

विनापरवाना बांधकाम निष्कासित करताना कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, तसेच निष्कासन कर्तव्यावरील उपस्थित कर्मचारी-अधिकारी यांची सुरक्षा व्हावी यासाठी पोलीस विभागाकडून सुरक्षा बंदोबस्त आवश्यक असतो. मात्र, स्थानिक पोलीस स्थानकाकडून अपुरी सुरक्षा व्यवस्था किंवा ती मिळण्याची शाश्वती नसल्याने अतिक्रमण निर्मूलनाच्या कामकाजात विलंब होत होता. यावर उपाय म्हणून मुंबई मंडळातर्फे महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या २५ कर्मचाऱ्यांच्या पथकाची निष्कासन कर्तव्यावरील म्हाडा कर्मचारी-अधिकारी यांची सुरक्षा व्हावी, यासाठी करार तत्वावर १ वर्षासाठी नेमणूक केली आहे. या पथकात १२ हत्यारी सुरक्षारक्षकांचाही समावेश आहे. या सुरक्षा रक्षकांमुळे अतिक्रमण निर्मूलन मोहिमेने वेग घेतला असून निष्कासन मोहिमेत सहभागी म्हाडा अधिकारी- कर्मचारी यांचा आत्मविश्वास वाढला आहे.

## ..अशी होते अतिक्रमण निर्मूलनाची कारवाई

मंडळात कार्यरत संबंधित भाडे वसुलीकार-लिपिक म्हाडा जमिनीवर झालेल्या अतिक्रमणाची पाहणी करतात. पाहणीनंतर संबंधित विभागाला याचा अहवाल दिला जातो. म्हाडा नियोजन प्राधिकरणाची रीतसर परवानगी न घेता म्हाडाच्या भूखंडावर अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी संबंधित अतिक्रमणधारकाला अतिक्रमण ४८ तासांत स्वतःहून काढण्याची नोटीस दिली जाते. तसेच अतिक्रमणधारकाला नोटीस प्राप्त झाल्यावर २४ तासांत लेखी / तोंडी स्वरूपातील पुरावे सादर करून करण्याची नैसर्गिक न्यायसंधी दिली जाते. मात्र, पुरावे न दिल्यास म्हाडातर्फे अतिक्रमण निष्कासनाची कारवाई केली जाते.

म्हाडा मालकीच्या जमिनीवर एखाद्या व्यक्तीस नवीन किंवा वाढीव पक्के बांधकाम करायचे असल्यास म्हाडाच्या वांद्रे पूर्व येथील मुख्यालयात बांधकाम परवानगी कक्ष, कक्ष क्रमांक २१, तळ मजला येथे विहित कागदपत्र दाखल करून बांधकामाची परवानगी घेऊन

अधिकृत बांधकाम करता येईल. तसेच तात्पुरत्या स्वरूपाच्या बांधकामासाठी परवानगी देण्याचे अधिकार संबंधित विभागाच्या कार्यकारी अभियंता यांना आहेत.

म्हाडा वसाहतीमध्ये अनधिकृत बांधकाम करणाऱ्या भोगवटाधारकाचे अनधिकृत बांधकाम, महाराष्ट्र नगररचना अधिनियम (MRTP Act) १९६६ मधील तरतुदीनुसार क्षेत्रीय पदनिर्देशित अधिकाऱ्यामार्फत पाडून टाकण्यात येते. असे अनधिकृत बांधकाम पाडून टाकण्यासाठी म्हाडा कार्यालयास आलेला खर्च संबंधित भोगवटाधारकाकडून वसूल केला जातो.

विनापरवाना किंवा अनधिकृत बांधकाम करू नये असे आवाहन तथा सावधानतेचा इशारा मुंबई मंडळातर्फे देण्यात आला आहे.

(हेमंत पाटील)
जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण








JCB


JCB

